पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

14 वर्ष वर्धापन दिन

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४४ ■ मंगळवार, दि.२३ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# मंत्र्यांच्या अनुपस्थितीवरून विधानसभेत गदारोळ....!

## सरकार प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी सक्षम – एकनाथ शिंदे

प्रतिनिधी २३ जून



**मुंबई:** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवन परिसरात राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहे. महागाई, दुष्काळ, पाणीटंचाई, वीजपुरवठा, ड्रग्सविरोधी कारवाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत सरकार प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम असल्याचा दावा केला आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांवरील आंदोलन, सभागृहातील गदारोळ, नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप आणि महत्त्वाच्या घोषणांमुळे अधिवेशनाचा दुसरा दिवस चांगलाच गाजत असून राज्यातील राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने दोन्ही सभागृहांत ९७,७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. आगामी काळातील राजकीय गणिते लक्षात घेता यातून शेतकरी, कष्टकरी महिला आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर निधीची मोठी तरतूद करण्यात आली आहे. विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी आणि शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ची घोषणा करत थेट २० हजार ५५२ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन व वेतनासाठी १,७३४ कोटींचा अतिरिक्त निधी मंजूर झाला आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ५०० कोटी दिले आहेत. आर्थिक अडचणीत सापडलेल्या सहकारी साखर कारखान्यांना बाहेर काढण्यासाठी ४८३ कोटी रुपये मंजूर केले आहेत. याशिवाय २०१७ मधील जुन्या शेतकरी सन्मान योजनेतील प्रलंबित देणी पूर्ण करण्यासाठी २०० कोटी मंजूर झाले आहेत. तसेच संजय गांधी दिव्यांग निराधार योजनेसाठी ८७४ कोटी दिले आहेत.

## राज्यात कुठेही लोडशेडिंग नाही- मुख्यमंत्री फडणवीस

राज्यात वीजटंचाई आणि लोडशेडिंगबाबत सुरू असलेल्या चर्चांदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठा खुलासा केला आहे. राज्यात काही औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते, काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या होत्या. मात्र या सर्व परिस्थितीत राज्यात एकाही दिवशी अधिकृत भारनियमन (लोडशेडिंग) करण्यात आलेले नाही, असा ठाम दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

## विधानसभेत 'तू-तू मैं-मैं'

विधानसभेत मंत्र्यांच्या अनुपस्थिती आणि त्यांच्याऐवजी इतर मंत्र्यांना किंवा राज्यमंत्र्यांना उत्तरे देण्याचे अधिकार देण्याच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. विधानसभा अध्यक्षांनी दिलेले स्पष्टीकरण अमान्य करत आदित्य ठाकरेंनी थेट विधिमंडळ कामकाजावर बहिष्कार टाकत 'वॉकआऊट' केला. यानंतर सभागृहात मंत्री शंभूराज देसाई यांनी त्यांना उत्तर दिले, तर स्वतः एकनाथ शिंदे यांनी सभागृहात उपस्थित राहून आदित्य ठाकरे आणि विरोधकांवर जोरदार पलटवार केला.

## बड्या बिझनेसमनच्या मुलाला लोहगडावरून ढकलले!



प्रतिनिधी २३ जून

**पुणे :** पुण्याच्या लोहगडावरून पडून मृत्यू झालेल्या केतन अग्रवाल प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले आहे. फोटोची पोज देताना केतन अग्रवाल घसरुन दरीत पडला नसून त्याला ढकलून दिल्याची धक्कादायक बाब तपासात समोर आली आहे. या प्रकरणी होणाऱ्या पत्नीसह तिच्या प्रियकराला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

गुरुवारी होणाऱ्या पत्नीचा वाढदिवस होता. त्या निमित्ताने केतन आणि होणारी पत्नी लोहगडावर ट्रेकिंगला गेले होते. त्यावेळी फोटोची पोज देताना तो घसरुन पडला, असे समोर आले होते. मात्र लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या तपासात हा बनाव असल्याचे उघड झाले आहे. होणाऱ्या पत्नीच्या प्रियकराने केतनला दरीत ढकलून दिल्याचे समोर आले आहे. या घटनेत होणाऱ्या पत्नीचा समावेश आहे का? यासंबंधीची चौकशी सुरु आहे. सोबतचं प्रियकराला कोणी-कोणी साथ दिली, याची चौकशी सुरु आहे.

## श्रींच्या पालखीचे पंकज देशमुख यांनी केले पूजन



प्रतिनिधी २३ जून



**अकोला:** श्री संत गजानन महाराजांची पालखी डाबकी रोडवर गजानन महाराज मंदिरात आली तेव्हा आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी पालखीचे पूजन केले.

यावेळी संस्थानच्या वतीने पंकज देशमुख, चिन्मय देशमुख, युनिट हेड राजेश निखाडे, नेहा पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

श्री संत गजानन महाराज मंदिराच्या वतीने लिंबु सरबत, मोहनभाऊ भगत व मित्र परिवारा तर्फे थंडपेय वितरण करण्यात आले. यावेळी सर्व प्रथम मंदिराचे पौरोहित्य शाम महाराज जोशी व बाळू महाराज जोशी यांनी केले. यावेळी अनिल दुबे, मोहन भगत, पांडूरंग भोयर, संतोष सहारे तसेच राम भक्त हनुमान मंदिर, श्री साई रामभरोसे शिव भक्त मंडळ, श्री शिव साम्राज्य प्रतिष्ठान, काळू माता मित्र मंड़ळ, कालंका माता मित्र मंडळ, ज्ञानेश्वर मंदिर, सेवाधारी समस्त डाबकी रोड़वासी भाविक भक्तांनी परिश्रम घेतले.






# ऑलिम्पिक : विविध संस्कृती, भाषा आणि देशांना एकत्र आणणारा जागतिक उत्सव !

ऑलिम्पिक स्पर्धा हा जगातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा क्रीडा महोत्सव मानला जातो. जगभरातील हजारो खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टता, मैत्री, शिस्त, समर्पण आणि जागतिक ऐक्य यांचे प्रतीक म्हणून ऑलिम्पिककडे पाहिले जाते. आज या स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा राहिलेल्या नाहीत, तर विविध संस्कृती, भाषा आणि देशांना एकत्र आणणारा जागतिक उत्सव बनल्या आहेत.




ऑलिम्पिक स्पर्धा हा जगातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा क्रीडा महोत्सव मानला जातो. जगभरातील हजारो खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टता, मैत्री, शिस्त, समर्पण आणि जागतिक ऐक्य यांचे प्रतीक म्हणून ऑलिम्पिककडे पाहिले जाते. आज या स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा राहिलेल्या नाहीत, तर विविध संस्कृती, भाषा आणि देशांना एकत्र आणणारा जागतिक उत्सव बनल्या आहेत.

ऑलिम्पिक स्पर्धांचा इतिहास सुमारे २,८०० वर्षांपूर्वीचा आहे. प्राचीन ग्रीसमधील ऑलिम्पिया या शहरात इ.स.पूर्व ७७६ मध्ये पहिल्या अधिकृत ऑलिम्पिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा ग्रीक देवता झ्यूसच्या सन्मानार्थ भरवल्या जात असत. त्या काळात ग्रीसमधील विविध शहर-राज्यांमधील खेळाडू एकत्र येऊन आपली क्रीडाकौशल्ये दाखवत असत. सुरुवातीला फक्त धावण्याच्या शर्यती आयोजित केल्या जात होत्या; परंतु नंतर कुस्ती, मुष्टियुद्ध, भालाफेक, चक्रफेक, लांब उडी आणि रथ शर्यत यासारख्या खेळांचाही समावेश करण्यात आला. प्राचीन ऑलिम्पिक स्पर्धांना धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व होते. स्पर्धांच्या काळात युद्धे थांबवली जात असत, जेणेकरून खेळाडू आणि प्रेक्षक सुरक्षितपणे स्पर्धास्थळी पोहोचू शकतील. विजेत्या खेळाडूंना सोन्या-चांदीची पदके दिली जात नसत; त्याऐवजी ऑलिव्ह वृक्षाच्या पानांचा मुकुट देऊन त्यांचा गौरव केला जात असे. हा सन्मान अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जात होता. मात्र, कालांतराने रोमन साम्राज्याचा प्रभाव वाढला आणि प्राचीन ग्रीक परंपरा लोप पावू लागल्या. इ.स. ३९३ मध्ये रोमन सम्राट थिओडोसियस प्रथम यांनी या स्पर्धांवर बंदी घातली. त्यानंतर जवळपास १,५०० वर्षे ऑलिम्पिक स्पर्धा अस्तित्वात नव्हत्या.




एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्सचे शिक्षणतज्ज्ञ आणि क्रीडाप्रेमी बॅरन पियरे द कुबर्टिन यांनी ऑलिम्पिक स्पर्धांचे पुनरुज्जीवन करण्याचा विचार मांडला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे १८९४ मध्ये आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) स्थापन करण्यात आली. त्यानंतर १८९६ मध्ये ग्रीसची राजधानी अथेन्स येथे पहिल्या आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये १४ देशांतील सुमारे २४१ खेळाडूंनी सहभाग घेतला. याच स्पर्धांपासून आधुनिक ऑलिम्पिक चळवळीची सुरुवात झाली.

आधुनिक ऑलिम्पिकची काही वैशिष्ट्ये विशेष उल्लेखनीय आहेत. ऑलिम्पिक ध्वजावरील पाच रंगीत वर्तुळे जगातील पाच खंडांचे प्रतिनिधित्व करतात. निळा, पिवळा, काळा, हिरवा आणि लाल हे रंग जागतिक ऐक्य, मैत्री आणि सहकार्याचे प्रतीक मानले जातात. याशिवाय ऑलिम्पिक ज्योत हीदेखील एक महत्त्वाची परंपरा आहे. ग्रीसमधील ऑलिम्पिया येथे सूर्यकिरणांद्वारे ही ज्योत प्रज्वलित केली जाते आणि मशाल रिलेच्या माध्यमातून यजमान देशात पोहोचवली जाते. उद्घाटन सोहळ्यात ही ज्योत प्रज्वलित केल्यानंतर स्पर्धांना अधिकृत सुरुवात होते. ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये विजेत्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके प्रदान केली जातात. या पदकांसाठी खेळाडू अनेक वर्षे कठोर परिश्रम, सराव आणि त्याग करतात. त्यामुळे ऑलिम्पिक पदक मिळवणे हे प्रत्येक खेळाडूचे सर्वोच्च स्वप्न मानले जाते. भारताचाही ऑलिम्पिक इतिहास गौरवास्पद आहे. १,९०० मध्ये नॉर्मन प्रिचर्ड यांनी भारतासाठी पहिले ऑलिम्पिक पदक जिंकले. त्यानंतर भारतीय हॉकी संघाने १९२८ ते १९८० या कालावधीत अनेक सुवर्णपदके जिंकून जगावर वर्चस्व गाजवले. मेजर ध्यानचंद यांचे नाव भारतीय हॉकीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. अलीकडील काळात अभिनव बिंद्रा, सुशील कुमार, मेरी कोम, पी. व्ही. सिंधू, नीरज चोप्रा आणि इतर अनेक खेळाडूंनी भारताला ऑलिम्पिकमध्ये गौरव मिळवून दिला आहे. आज ऑलिम्पिक स्पर्धा जगातील सर्वात मोठा क्रीडा सोहळा बनल्या आहेत. उन्हाळी आणि हिवाळी अशा दोन प्रकारच्या ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित केल्या जातात. शेकडो देशांतील हजारो खेळाडू या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. खेळांच्या माध्यमातून शांतता, बंधुता, समानता आणि मानवतेचा संदेश देणे हे ऑलिम्पिकचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्राचीन ग्रीसपासून आधुनिक जागतिक व्यासपीठापर्यंतचा ऑलिम्पिकचा प्रवास हा मानवी जिद्द, क्रीडा प्रेम आणि जागतिक ऐक्याचा प्रेरणादायी इतिहास आहे. बदलत्या काळानुसार स्पर्धांचे स्वरूप बदलले असले, तरी उत्कृष्टतेचा ध्यास, प्रामाणिक स्पर्धा आणि जगाला एकत्र आणण्याची भावना आजही ऑलिम्पिकचे खरे वैशिष्ट्य आहे.

# तत्वनिष्ठ शिक्षक नेते व निष्कलंक लोकप्रतिनिधी: प्रा. बी.टी. देशमुखर सर !

नागपूर युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशन अर्थात नूटा या शिक्षक संघटनेचे तत्त्वनिष्ठ शिक्षक नेते आणि पदवीधर मतदार संघाचे तब्बल तीस वर्षे प्रतिनिधित्व करून बेरोजगार युवकांच्या, शिक्षकांच्या समस्या आणि विदर्भाच्या सिंचन अनुशेषावर प्रदीर्घ लढा उभा करणारे निष्कलंक झुंझार लोकप्रतिनिधी प्रा.बी. टी. देशमुख सर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी दिनांक १९ जून, २०२६ रोजी अमरावती येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक क्षेत्राची फार मोठी आणि कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.



**नूटाचे शिल्पकार व तत्त्वनिष्ठ शिक्षक नेते :** प्रा.बी. टी.देशमुख सर यांचे मूळ नाव भाऊराव तुळशीराम देशमुख, मात्र संपूर्ण महाराष्ट्रात ते प्रा. बी. टी. देशमुख म्हणून सुपरिचित होते. त्यांनी १९५७ मध्ये पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली होती. त्यानंतर ते अमरावतीच्या श्री शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांनी आपल्या अध्यापन कौशल्यातून एक हाडाचा शिक्षक कसा असावा याचा आदर्श घालून दिला.

त्यांची जीवनशैली अगदी साधी पण करारी होती. ते स्पष्टवक्तेपणा आणि संसदीय मूल्यांचा आग्रह बाळगणारे नेते म्हणून सुप्रसिद्ध तर होतेच पण त्यांच्या नेतृत्त्व गुणांमुळे त्यांना सर्वपक्षीय नेत्यांमध्ये अत्यंत आदराचे स्थान होते.

त्याकाळात प्राध्यापकांचे वेतनमान फारच कमी तर होतेच पण पगारही नियमित होत नसत. त्यामुळे प्राध्यापकांना आर्थिक विवंचनेत व सामाजिक मानहानी सहन करत जीवन जगावे लागत होते. अध्यापन करून पिढी घडविणाऱ्या शिक्षक प्राध्यापकांची ही अवस्था प्रा.बी. टी. देशमुख सरांना अस्वस्थ करत होती. म्हणून त्यांनी प्राध्यापकांच्या समस्यांना वाचा फोडून सरकारशी संवैधानिक मार्गाने संघर्ष उभा करून प्राध्यापक शिक्षकांना न्याय मिळावा व त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्राध्यापक व शिक्षकांच्या हक्कांसाठी प्रदीर्घ लढा दिला. विनाअनुदानित शाळा, शिक्षक आणि प्राध्यापकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी विधिमंडळात सातत्याने आवाज उठवला, त्यामुळे ते सर्व शिक्षक वर्गाचे नेते झाले.

**निष्कलंक लोकप्रतिनिधी:** नूटाच्या कार्यातून प्रा.बी. टी.देशमुख सरांनी महाराष्ट्रातील शिक्षक प्राध्यापकांना एकजूट करून त्यांच्या समस्या सोडविण्याचे जे अनमोल व ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळे ते सर्वांमध्ये सुपरिचित तर झालेच पण ते सर्वांचे आदरणीय नेते झाले. म्हणून शिक्षक प्राध्यापकांच्या आग्रहावरून त्यांनी १९८० मध्ये अमरावती पदवीधर मतदार संघाची निवडणूक लढविली आणि विजयी झाले. त्यानंतर त्यांनी सलग ३० वर्षे म्हणजे ६ टर्म अमरावती पदवीधर मतदार संघाचे नेतृत्व केले.

लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी विधानपरिषदेत शिक्षक प्राध्यापक व बेरोजगार युवकांच्या समस्यांची अभ्यासपूर्ण मांडणी करून त्यांना न्याय मिळवून दिला. यासोबतच त्यांनी विदर्भाच्या सिंचन अनुशेषावर अभ्यासपूर्ण मांडणी करून सतत पाठपुरावा केला आणि विदर्भाच्या विकासासाठी विदर्भ विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी सरकारला बाध्य केले. त्यांनी विधिमंडळात केलेली अभ्यासपूर्ण भाषणे आणि मांडलेली आकडेवारी यामुळेच त्यांना 'सिंचन अनुशेष निर्मूलनाचे जनक' म्हणून ओळखले जात होते. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची कारकिर्द दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आणि अद्वितीय व निष्कलंक राहिली आहे.

**विद्यापीठ निर्मितीत मोलाचे योगदान:** प्रा. बी. टी. देशमुख सर हे विदर्भातील एक थोर शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत आणि निष्कलंक लोकप्रतिनिधी होते. समस्त मागासवर्गीय आणि उपेक्षित घटकांच्या विकासासाठी अन्यायाची कारणे शोधून त्याविरोधात लढण्याची ताकद त्यांनी समाजात निर्माण केली.

यासोबतच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेत व उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान होते. नूटा संघटनेच्या माध्यमातून त्यांनी सुशिक्षितांचे नेतृत्व कसे असावे याचा आदर्श निर्माण केला. अमरावती पदवीधर मतदार संघाचे आमदार म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य तर केलेच पण दरवर्षी आपल्या आमदारकीच्या निधीचा हिशोब मतदारांसमोर ठेवून पारदर्शक कारभाराचा आणि निस्वार्थ व निरपेक्षपणे काम करण्याचा पायंडा त्यांनी घालून दिला.

प्रा. बी. टी.देशमुख सर यांनी वक्तृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्वाचा महामेरू म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण तर केलीच पण यासोबतच त्यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली हजारो प्राध्यापकांना घडवून त्यांच्यात शिस्त, जिद्द, अभ्यासुवृत्ती, निडर व निरपेक्ष नेतृत्व करण्याची क्षमता वृद्धिंगत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सरांचे नेतृत्व विरोधकांनाही त्यांचा आदर वाटावा एवढे दिलखुलास व मनमोकळे पण तितकेच शिस्तप्रिय, वक्तशीर आणि दिलेला शब्द पाळणारे होते. प्रा. बी. टी. देशमुख सरांचे विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील प्राध्यापकवर्ग त्यांचा चाहता होता.

प्रा.बी. टी.देशमुख सर लढवय्ये नेतृत्वाचे आणि आजीवन साधना करणारे तपस्वी होते.

त्यांच्या अभ्यासपूर्ण साधनेतून त्यांनी जे काम केले ते सर्वांना मार्गदर्शक तर आहेच पण चिरकाल स्मरणात राहणारे आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षक, प्राध्यापक व लोकप्रतिनिधींनी आपापली भूमिका व जबाबदारी पार पाडणे हीच भाऊंना खरी आदरांजली ठरेल. प्रा. बी. टी. भाऊ देशमुख सरांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन...!

**प्रा. डॉ.एम.आर.इंगळे**
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि विभागीय सचिव डाटा, अकोला

# २३ लाख स्वप्नांचे काय ? जागा फक्त दोन लाख

'डॉक्टर व्हायचे आहे!' हे वाक्य उच्चारताना लाखो विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत चमक असते, तर त्यांच्या आई-वडिलांच्या मनात आशेचा दिवा तेवत असतो. आपले मूल डॉक्टर व्हावे, समाजाची सेवा करावी, कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, या एका स्वप्नासाठी लाखो पालक स्वतःच्या इच्छा-आकांक्षांचा त्याग करतात.



शेतकरी वडील उन्हातान्हात राबतात, मजूर आई हातावर पोट असतानाही मुलांच्या शिक्षणासाठी पै-पै साठवते, मध्यमवर्गीय कुटुंबे स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलांच्या भवितव्यासाठी कर्जाच्या ओझ्याखाली दबतात. पण या सर्व त्यागाचे, संघर्षाचे आणि आशेचे काय, जर देशातील शिक्षणव्यवस्थाच त्यांच्या स्वप्नांच्या आड उभी राहणार असेल? यंदाच्या नीट परीक्षेसाठी तब्बल २३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केला. ही संख्या केवळ एक आकडा नाही; ती २३ लाख कुटुंबांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. परंतु या २३ लाख विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या वैद्यकीय शिक्षणाच्या जागा अवघ्या दोन लाखांच्या आसपास आहेत. म्हणजे जवळपास २० लाख विद्यार्थ्यांच्या वाट्याला अपयश नव्हे, तर व्यवस्थेने उभारलेली एक अभेद्य भिंत येणार आहे. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की, ही परीक्षा विद्यार्थ्यांची आहे की व्यवस्थेच्या अपुऱ्या नियोजनाची?



देशात डॉक्टरांची कमतरता असल्याचे सरकारकडून वारंवार सांगितले जाते. ग्रामीण भागात आरोग्यसेवा कोलमडलेली आहे, अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त आहेत, विशेषज्ञ डॉक्टरांचा तुटवडा आहे, असे चित्र सातत्याने समोर येत असताना दुसरीकडे लाखो गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित ठेवण्याची ही विसंगती नेमकी कोणत्या तर्कावर आधारित आहे? एका बाजूला देशाला डॉक्टर हवे आहेत, तर दुसऱ्या बाजूला डॉक्टर होण्यासाठी झटणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी दारे बंद ठेवली जात आहेत. यापेक्षा मोठा विरोधाभास दुसरा कोणता असू शकतो? आज ६००, ६५० आणि त्याहून अधिक गुण मिळवणारे विद्यार्थीही प्रवेशासाठी संघर्ष करताना दिसत आहेत. पूर्वी इतके गुण मिळाले तर गुणवंत विद्यार्थी म्हणून त्याचा गौरव केला जायचा. पण आज एवढे गुण मिळवूनही प्रवेशाची खात्री नसते. याचा अर्थ विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी झाली आहे असे नाही; उलट स्पर्धा इतकी तीव्र झाली आहे की गुणवत्ता असूनही संधी मिळत नाही. त्यामुळे हे स्पष्ट होते की अपयश विद्यार्थ्यांचे नसून, अपयश हे शिक्षणव्यवस्थेचे आहे. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वाधिक वेदना सहन कराव्या लागतात त्या पालकांना. एखाद्या शेतकऱ्याने मुलाच्या शिक्षणासाठी जमीन गहाण ठेवलेली असते. एखाद्या आईने स्वतःचे दागिने विकलेले असतात. एखाद्या वडिलांनी स्वतःच्या आजारपणाकडे दुर्लक्ष करून मुलांच्या कोचिंगसाठी पैसे उभे केलेले असतात. अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडूनही मुलांच्या स्वप्नांसाठी झगडत असतात. पण शेवटी निकाल लागतो आणि एक वाक्य त्यांच्या आयुष्यावर आघात करून जाते.ठजागा उपलब्ध नाही.ठ हे वाक्य केवळ प्रवेश न मिळाल्याचे नसते; ते लाखो पालकांच्या त्यागावर, आशेवर आणि संघर्षावर पाणी फेरणारे असते. याहूनही अधिक चिंताजनक बाब म्हणजे शिक्षणाच्या नावाखाली निर्माण झालेला कोचिंग उद्योग. आज नीट परीक्षा ही केवळ परीक्षा राहिलेली नाही, तर ती अब्जावधी रुपयांचा व्यवसाय बनली आहे. लाखो रुपये फी घेणारे कोचिंग क्लासेस, दोन-दोन आणि तीन-तीन वर्षे ड्रॉप घेऊन तयारी करणारे विद्यार्थी, सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत चालणारा अभ्यास, सततची स्पर्धा आणि अपयशाची भीती यामुळे विद्यार्थ्यांचे बालपण आणि तारुण्य हरवत चालले आहे. शिक्षणाचा आनंद हरवून त्याजागी तणाव, भीती आणि नैराश्याने घर केले आहे. ही परिस्थिती एका संवेदनशील समाजासाठी निश्चितच धोक्याची घंटा आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे आज विद्यार्थ्यांमधील नैराश्य वाढत आहे. अपयशाची भीती, पालकांच्या अपेक्षा, समाजाचा दबाव आणि स्पर्धेचे ओझे यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाखाली जगत आहेत. काही दुर्दैवी घटनांमध्ये विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतल्याच्या बातम्याही समोर आल्या आहेत. ही केवळ वैयक्तिक शोकांतिका नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनाहीनतेचा आरसा आहे. कोणत्याही विद्यार्थ्याचा जीव हा गुणांपेक्षा आणि रँकपेक्षा अधिक मौल्यवान आहे, हे आपण कधी समजून घेणार?

सरकारी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला नाही तर खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचा पर्याय समोर येतो. पण या महाविद्यालयांच्या लाखो-कोट्यवधी रुपयांच्या फी पाहिल्यानंतर सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी तो पर्याय म्हणजे केवळ मृगजळ ठरतो. डॉक्टर होण्याचा अधिकार केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांनाच आहे का? संविधानाने दिलेली समान संधी ही केवळ कागदावरच राहणार आहे का? गुणवत्तेपेक्षा पैशाला अधिक महत्त्व देणारी व्यवस्था अखेरीस सामाजिक विषमता वाढविणारी ठरत नाही का, याचाही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

खरे तर तीन तासांच्या एका परीक्षेवर विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य अवलंबून असणे हीच अत्यंत अन्यायकारक बाब आहे. एखादा दिवस खराब गेला, एखादी चूक झाली किंवा मानसिक ताणामुळे अपेक्षित कामगिरी झाली नाही, तर अनेक वर्षांची मेहनत एका क्षणात वाया जाते. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचे आणि गुणवत्तेचे मोजमाप केवळ एका परीक्षेच्या आधारे करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न आता समाजाने आणि सरकारने स्वतःला विचारला पाहिजे.

आज गरज आहे ती केवळ सहानुभूती व्यक्त करण्याची नाही, तर ठोस निर्णय घेण्याची आहे. देशभरात मोठ्या प्रमाणावर नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालये उभारली पाहिजेत. एमबीबीएस आणि इतर आरोग्य शिक्षणाच्या जागांमध्ये लक्षणीय वाढ झाली पाहिजे. खासगी महाविद्यालयांच्या अवाजवी फीवर नियंत्रण आणले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य आणि समुपदेशन व्यवस्था अधिक सक्षम केली पाहिजे. तसेच एकाच परीक्षेवर भविष्य अवलंबून राहणार नाही, अशी व्यापक आणि न्याय्य शिक्षण व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

आजचा प्रश्न फक्त २० लाख विद्यार्थ्यांचा नाही. तो भारताच्या भवितव्याचा आहे. तो लाखो पालकांच्या अश्रूंचा आहे. तो संघर्ष करणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबांच्या वेदनेचा आहे. तो शिक्षणातील समान संधीच्या मूलभूत अधिकाराचा आहे. कारण आज २० लाख विद्यार्थी अपयशी ठरत नाहीत; अपयशी ठरत आहे ती व्यवस्था, जी त्यांच्या कष्टांना, गुणवत्तेला आणि स्वप्नांना न्याय देण्यात असमर्थ ठरत आहे.लाखो पालकांच्या मनात आज एकच प्रश्न अस्वस्थपणे घोंघावत आहे.आमच्या मुलांनी अजून किती संघर्ष करायचा? त्यांच्या स्वप्नांची किंमत नेमकी किती? आणि त्यांच्या कष्टांना न्याय मिळणार तरी कधी? कारण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने अजूनही जिवंत आहेत. जिवंत आहे त्यांची जिद्द, त्यांचा संघर्ष आणि त्यांचे कर्तृत्व. मात्र, जर संधींचे दरवाजेच बंद राहिले, तर इतिहास या २० लाख विद्यार्थ्यांना अपयशी म्हणणार नाही; तो व्यवस्थेलाच अपयशी ठरवेल. आणि त्या दिवशी देशातील प्रत्येक पालकाचा आक्रोश एकच असेल,ठआमची मुले हरली नाहीत, त्यांना हरवले गेले आहे!

**गजानन ओंकार हरणे**
जिल्हा परिषद नगर, खडकी ,अकोला

## दिन विशेष
## आज जागतिक ऑलिम्पिक दिन




दरवर्षी २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. २३ जून १८९४ रोजी पॅरिसमध्ये 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती'ची स्थापना झाली. आधुनिक ऑलिम्पिक खेळांचे जनक बॅरन पियरे डी कुबर्टिन यांच्या प्रेरणेने या समितीची स्थापना झाली. या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण म्हणून पहिला ऑलिम्पिक दिन २३ जून १९४८ रोजी साजरा करण्यात आला. खेळांना आणि शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन देणे, वयाची, लिंगाची किंवा पार्श्वभूमीची पर्वा न करता प्रत्येकाला क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे. उत्कृष्टता, मैत्री आणि आदर यांचा प्रसार करणे हे ऑलिम्पिकचे मूल्य आहे. या निमित्ताने जगभरात विविध क्रीडा स्पर्धा, 'ऑलिम्पिक डे रन' आणि शारीरिक हालचालींना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित केले जातात.

या वर्षाच्या ऑलिम्पिक दिनाची थीम 'तू हे करू शकतोस' अशी आहे. ही थीम आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या 'लेट्स मूव्ह' या जागतिक मोहिमेचा एक भाग आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश तरुणांमधील स्वतःबद्दलची शंका दूर करून खेळ आणि शारीरिक हालचालींच्या माध्यमातून आत्मविश्वास निर्माण करणे हा आहे. ऑलिम्पिक दिनाचे तीन मुख्य स्तंभ -हा दिवस मुख्यत्वे तीन तत्त्वांवर आधारित उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

१) मूव्ह (हालचाल करा) : यामध्ये सर्व वयोगटातील लोकांना धावणे, चालणे किंवा कोणत्याही शारीरिक खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

२) लर्न (शिका) : ऑलिम्पिकचा इतिहास, त्याची मूल्ये (उत्कृष्टता, मैत्री, आदर) आणि समाजातील खेळांचे महत्त्व याबद्दल जनजागृती केली जाते.

३) डिसकव्हर (शोध घ्या) : लोकांना त्यांच्या परिसरातील नवीन खेळ आणि क्रीडा प्रकारांचा शोध घेण्यास आणि ते शिकण्यास मदत केली जाते.

**जगभरातील आयोजने**

ऑलिम्पिक डे रन : जगभरातील १५० हून अधिक राष्ट्रीय ऑलिम्पिक समित्यांद्वारे स्थानिक पातळीवर धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच अनेक देशांमध्ये या दिवशी शालेय स्तरावर विशेष क्रीडा उपक्रम, चित्रकला स्पर्धा आणि ऑलिम्पिक खेळाडूंशी संवाद सत्रे आयोजित केली जातात.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गजानन महाराजांच्या पालखीचे कस्तुरी संस्थेतर्फे स्वागत




प्रतिनिधी २३ जून

**अकोला :** श्री संत गजानन महाराजांची पालखी गायगाव वरून भौरदकडे मार्गस्थ झाली. वाटेत कस्तुरी संस्थेतर्फे श्रींचा अश्व व श्रींच्या पालखीचे पूजन व स्वागत कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर बुटोले व माजी आमदार वसंतराव खोटरे यांच्या हस्ते करण्यात आले.

आषाढी एकादशी निमित्त पंढरीची वारी करणाऱ्या शेगावच्या पालखीचे यंदाचे ५७ वे वर्ष असून पालखी गायगाव मार्गावरून भौरद कडे प्रस्थान करीत असताना मार्गात कस्तुरी या सामाजिक संस्थेतर्फे श्रींच्या पालखीचे भव्य स्वागत करण्यात आले व श्रींच्या पालखीतील वारकऱ्यांना शितल जल , शितपेय व होमिओपॅथी औषध ' सनकुल ' चे वितरण करण्यात आले. याप्रसंगी कस्तुरीचे संस्थापक प्रा. किशोर बुटोले,माजी आमदार वसंतराव खोटरे सर्वश्री संजय गायकवाड, राजेश्वर पेठकर, श्रीमती अनिता इधोळ, अमर शर्मा, घनश्याम चांडक ,प्रा. डॉ. रत्ना चांडक, ॲड . अशोक शर्मा प्रा. अनिल मुळे ,प्रा. डॉ .सौ सीमा मुळे, वसंतराव देशमुख, डॉ.सचिन धर्माधिकारी ,राम भिरड,श्रीमती ज्योती सुलताने सौ. माया बुटोले,श्रीमती उमा कारिया ,सौ. वर्षा गिरी ,श्री दामोदर नुपे , अविनाश खुंटे आदी मान्यवर उपस्थित होते. स्थानिक होमिओपॅथी मेडिकल कॉलेजच्या प्रशासनाने 'सनकुल' औषध सेवा उपलब्ध करून दिली यासाठी डॉ. सचिन धर्माधिकारी व डॉ. सुयोग जोहरापूरकर यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी अनेक भक्तांनी श्रींच्या पालखीचे पूजन व दर्शन घेतले.

# बेघर निवारा बांधकामाच्या देयका साठी आमसभेत मतदान

प्रतिनिधी २३ जून

**◆ समर्थनार्थ ४२ मते तर विरोधात पडली सत्तावीस मते, एक सदस्य तटस्थ**

**अकोला:** आज विविध विषयांना घेऊन महापालिकेची सभा चांगलीच गाजली विरोधकांनी सत्ताधाऱ्यावर आरोपाच्या फैरी झाडल्या तर तितक्याच ताकदीने सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले. मागील सभेचे इतिवृत्त कायम केल्यानंतर प्रभाग क्रमांक सहा मध्ये सोनी कॉलनी येथे सरफेस इंटिरियर ते जॉकी शोरूम पर्यंत सिमेंट कॉँक्रीटच्या रस्ता बांधण्याच्या विषयावरून विरोधी पक्षनेते डॉक्टर जीशान हुसेन यांनी महापालिकेचे अभियंता अजय गुजर यांना चांगलेच कैचीत पकडले होते. हा रस्ता आधीच निर्माण झाल्याचे त्यांनी मत व्यक्त करीत या रस्त्याचा जीपीएस फोटो सुद्धा सभागृहासमोर सादर केला. त्यावर स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी मुद्देसूद उत्तर देत हा विषय निकाली काढला. तर मे.मालांनी कम्बाईन यांची बेघर निवारा बांधकामाचे देयक अदायेगी बाबत नोटीसला अनुसरून देयकाची रक्कम अदा करण्यासाठी चर्चा करून निर्णय घेणे यावर विरोधक आणि आणि सत्ताधाऱ्यांमध्ये चांगलीच खडाजंगी उडाली. हा ठेकेदार सत्ताधाऱ्यांचा लाडका असल्याचा आरोप विरोधकांनी केला. बेघर निवारा चे बांधकाम हे केंद्र सरकारच्या निधीतून करण्यात आले. राज्यात सर्वात आधी अकोला शहरातील बेघर निवारा केंद्राचे काम पूर्ण करण्यात आले. परंतु निधी रखडल्याने केंद्र सरकारने महापालिकेला पत्र लिहीत सदर ठेकेदाराचे उर्वरित बिल महापालिका ने द्यावे असे निर्देश दिले होते. यावर विरोधकांना उत्तर देताना स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी म्हटले की त्याच्या भरोशावर कर्मचाऱ्यांचे पगार सुद्धा होत नाहीत केंद्र व राज्य सरकारच्या निधीवर महापालिकेचा कारभार चालतो जर त्यांनी ठेकेदाराचे पैसे द्या म्हटले तर द्यावेच लागतील आपण शासनापेक्षा मोठे नाही त्यामुळे ठेकेदाराचा हा पैसा द्यावाच लागेल असे ठणकावून सांगितले. त्यावर विरोधकांनी ठेकेदाराच्या चार करोड पस्तीस लाख रुपयांसाठी मतदान घेण्याची विनंती केली. यानंतर या विषयावर मतदान घेण्यात आले विषयाच्या समर्थनार्थ ४२ सदस्यांनी हात उंचावून मतदान केले तर विरोधात २७ मते पडली तर एका सदस्याने तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला. यानंतर सभागृहाचे कामकाज थांबविण्यात आले बातमी लिहिस्तोवर सभागृहाचे कामकाज सुरू झाले नव्हते.

**आज सुद्धा आयुक्तांनी दाखवला करारी बाणा**

◆ बेघर निवारा बांधकामाच्या ठेकेदाराच्या देयका बाबत शासनाने जे पत्र दिले आहे ते आयुक्तांनी वाचून दाखवावे अशी मागणी वंचित चे पराग गवई यांनी केली असता आयुक्तांनी त्यांना तुम्ही मला पत्र वाचून दाखवा असं म्हणू शकत नाही असे खडसावीत आपण स्वतः या पत्राची एक प्रत घ्या आणि स्वतः वाचा किंवा सभागृहाला वाचून दाखवा असे ठणकावून सांगितले

## जिल्हा स्त्री रूग्णालयासमोरील खड्डा धोकादायक

प्रतिनिधी २३ जून

**अकोला :** शहरातील मुख्य वर्दळीचा रस्ता असलेल्या दुर्गा चौक ते अग्रसेन चौक या सिमेंट रस्त्यावर जिल्हा स्त्री रूग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर मोठा खड्डा पडला आहे. विशेष म्हणजे हा रस्ता नुकताच बांधण्यात आला आहे. बरोबर रस्त्याच्या मधोमध असलेला हा चौकोनी खड्?डा अर्धा ते एक फूट खोल असल्याने यातून कोणतेही वाहन गेली तरी कंबर व मानेला झटका बसल्याशिवाय राहत नाही. अनेक वेळा या खड्ड्यातून गाडी उसळून किरकोळ अपघातही झाले आहेत. त्यामुळे या धोकादायक खड्ड्याची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी या मार्गावरील वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

# गुटख्यासह ११ लाख १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २३ जून



**तेल्हारा :** अन्न व औषध प्रशासन आणि तेल्हारा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अवैध गुटखा वाहतूक करणारी बोलेरो पिकअप जप्त केली. या कारवाईत सहा लाख एकोणीस हजार रुपयांचा प्रतिधंधित गुटखा आणि पाच लाख रुपये किमतीचे बोलेरो पिकअप वाहन असा एकूण अकरा लाख एकोणीस हजार रुप्यांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मिळलेल्या माहितीनुसार, तेल्हारा येथील पी.पी. पाटील पेट्रोल पंप परिसरात संशथित बोलेरो पिकअप वाहनाची तपासणी करष्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून विविध प्रकारचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले.आरोपी अटकेत या प्रकरणात बाला जयस्वाल (रा. डुकी, ता. संगामपूर, जि. बुलढाणा) याला अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. फरार आरोपीचा शोध सुरु आहेसंयुक्त पथकाची कारवाई ही कारवाई अन्स्युस्खा अधिकारी रविद सोलंके, किशोर बोरवोटे (अकोला), गुप्तवार्ता विभागांचे संदीप सूर्यवंशी (अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच तेल्हारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष इंगळे, उप सिरोक्षक रामेश्वर गिरी पो हे कॉ. योगेश उमक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजु इं गळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला

# खंडाळा शेतशिवारात शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी २३ जून

**अकोला :** प्रतिनिधी हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम खंडाळा या शेतविरात खंडाळा येथील रहिवाशी शेतकरी रवींद्र रामदास सागूनवेळे वय(४४) वर्ष या तरुण शेतकऱ्यांने शेतातून येतो असे घरच्या लोकांना सागून दिनांक २१ जून च्या दुपारी शेतात जाऊन झाडाला गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मर्ग दाखल केला, या घटनेचा तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत, आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याने कर्जामुळे आत्महत्या केली असेल असे बोलले जात असून शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी तसेच आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी त्या शेतकऱ्याचा मोठा आप्त परिवार आहे, शासनाने त्वरित विम्याचे कवच द्यावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# आलेगावला मुसळधार पावसाने झोडपले

प्रतिनिधी २३ जून



**आलेगाव :** या वर्षी उन्हाच्या पाऱ्याने उच्च पातळी गाठत संपूर्ण जिल्ह्याला वैताग आणला असून गेल्या काही दिवसांपासून आलेगाव मध्ये उन्हाच्या उकाड्याने नागरिक हैराण झालेले असताना २१ रोजी दुपारी पावसाचे वातावरण तयार झाले आणि दुपारी १.३० वाजता दरम्यान वादळ आणि मुसळधार पावसाने जवळपास ४५ मिनिट जोरदार हजेरी लावली. रस्त्यावरील पाणी अनेकांच्या घरामध्ये शिरले असले तरी काही नुकसान झाले नसल्याचे समोर आले आहे.गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या नागरिकांना उकाळ्या पासून दिलासा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. पातूर तालुक्यातील आलेगावातील ग्रामस्थ उकाळ्या पासून दिलासा मिळावा म्हणून चातका प्रमाणे पावसाच्या प्रतिक्षेत होते.तर वरून राजाने ती प्रतीक्षा मान्य करीत दिनांक २१ रोजी १.३० वाजता दरम्यान सोसाट्याच्या वादळासह मुसळधार पावसाने आलेगाव नगरीला झोडपून काढले.अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पावसाचे तलाव निर्माण झाले.सदर पावसामुळे कोणतेही नुकसान झाल्याचे समोर आले नाही.झालेल्या पावसामुळे ग्रामस्थांना उकाळ्या पासून दिलासा मिळाल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.

## संत गजानन महाराज पालखीचे राष्ट्रवादीचे नेते संदीप पाटील यांच्याकडून सपत्नीक पूजन



प्रतिनिधी २३ जून

**बाळापूर:** संत गजानन महाराज पालखी सोहळा पंढरपुरकडे जाण्यासाठी निघाला. जिल्ह्याच्या सिमेवर आगमन होताच जागोजागी पाणी व मठ्ठा चे वाटप भक्तांना करण्यात आले. तसेच मनारखेड येथील पालखीसोबत उरळ पोलीस स्टेशनचा वतीने कडक पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.तसेच कसुरा प्रवेश व्दार जवळ कसुरा येथील गावकरी मंडळीचा वतीने मठ्ठाचे वाटप करण्यात आले.तसेच कसुरा फाटा या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग अकोलाचा वतीने मठ्ठाचे वाटप केले. बाळापूर तालुक्यातील मनारखेड येथील शेत शिवारामध्ये राष्ट्रवादीचे नेते संदीप पाटील यांनी सपत्नीक श्रीचे पुजन करुन भक्तांना फराळ व मठ्ठा किटचे वाटप करण्यात आले.

# साहित्यिकांनो लिहित राहा.. डॉ. प्रतिमा इंगोले

## हातरूण येथे जिल्हा साहित्यिक मेळावा, कवी संमेलन

प्रतिनिधी २३ जून




**अकोला :** योगिनी समाजसेवा संस्था अकोला द्वारा महादेवनाथ महाराज मुलांचे वसतीगृह हातरूणच्या नवीन इमारत बांधकाम शुभारंभ तथा जिल्हा साहित्य मेळावा व कवी संमेलन नुकतेच आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रतिमा इंगोले अध्यक्षपदावरून बोलताना म्हणाल्या, अकोला जिल्हा ही साहित्याची खाण असलेली नगरी असून या जिल्ह्याला साहित्य चळवळीची मोठी परंपरा लाभलेली आहे. बाजीराव पाटील, विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी कवठेकर यासारख्या अनेक मातंबर साहित्यिकांनी या जिल्ह्याला महाराष्ट्रात ओळख निर्माण करून दिली. जिल्ह्यातील अनेक साहित्यिकांचे साहित्य पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रमाला लागले असून जिल्ह्यात साहित्य चळवळ मोठ्या प्रमाणात राबवल्यात जात आहे. अंकुर साहित्य संघ, विदर्भ साहित्य संघ, सुजन साहित्य संघ, तरुणाई फाऊंडेशन, कलाविष्कार साहित्य संघ, रजधूळ मासिक, योगिनी समाजसेवा संस्था, शुभम मराठी साहित्य मंडळ, भावगंध साहित्य संघ अनेक संघटनांनी अकोला जिल्हातील साहित्यिकांना हक्काच व्यासपीठ अकोला जिल्ह्यात सातत्याने मिळवून दिले आहे. ही नवोदित साहित्यिकांसाठी अभिमानाची बाब असून साहित्यिकांनी नवीन काहीतरी लिहिले पाहिजे. मेळाव्याचे उद्घाटन नीता बोबडे यांनी केले तर प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर योगिनी समाज सेवा संस्थेच्या अध्यक्ष देवका देशमुख डॉ. विजय दुतोंडे, सुनील लव्हाळे, तुळशीराम बोबडे आदीची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय दुतोडे यांनी तर सूत्रसंचालन शुभांगी पोकळे यांनी केले. त्यानंतर लगेच कवी संमेलनला सुरुवात करण्यात आली. निशा बोबडे, सुनिता भुजबळ, अमिता घाटोळ, संगीता ताथोड, गजानन छबिले, राजाभाऊ देशमुख, प्रमोद रोहनकर, तुळशीराम बोबडे, संदीप देशमुख, रोहिणी गंदेवार, गजानन देशमुख, अमोल गोडचवर, मनीषा बोरे, ज्योती कुलकर्णी, अशोक शिरसाट, अरुणा रोठे, लता थोरात, सुनील लव्हाळे आदिनी रचना सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र देशमुख, किशोरराव देशमुख निकिता बेले, सुनील देशमुख, शुभांगी पोळके, पूजा मोरे, तीष्णमाला तायडे, कुशल महल्ले, विजय अग्रवाल आदिनी परिश्रम घेतले.

# दुर्गा चौकातील बारच्या किचनमध्ये अचानक आग

प्रतिनिधी २३ जून

**अकोला :** शहरातील रामदासपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुर्गा चौक परिसरात रविवारी रात्री एका बारच्या किचनमध्ये अचानक आग लागल्याची घटना घडली. शाकांबरी स्क्वेअर येथील बारगधील चिमणीने पेट घेतल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठी दुर्घटना टळली.

शाकांबरी स्क्वेअर परिसरात असलेल्या बारच्या किचनमधील चिमणीमधून अचानक धूर व ज्वाळा बाहेर पडू लागल्या. काही क्षणातच आगीने उग्र रूप धारण केल्याने बारमधील कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये एकच धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळविले.


**NAME CHANGE**

I have change my name From, **RAHIM KHAN UMER KHAN TO, RAHIM KHAN UMAR KHAN**
Passport No. B0024049
AADHAAR No. 8011 1461 6711
PAN No.DKZPK2129G

- Address -
MULLANI CHOUK, KHADAN, CHANDUR, P.O. GANDHINAGAR, AKOLA DIST. AKOLA - 444004

# जागतिक पर्यावरण दिन शिखर परिषदेत ए. एस. नाथन यांना पर्यावरण उत्कृष्टता पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी २३ जून



**अकोला :** राजस्थान पर्यावरण आणि ऊर्जा संवर्धन केंद्रातर्फे जयपुरातील हॉटेल क्लार्क्स आमेर येथे आठवी जागतिक पर्यावरण दिन शिखर परिषद २०२६ झाली. त्यात पर्यावरण संरक्षण आणि वृक्षारोपण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे पर्यावरणप्रेमी ए. एस. नाथन यांना 'पर्यावरण उत्कृष्टता पुरस्कार – २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

नाथन यांचे अभिनव 'स्वस्तिक वृक्षारोपण प्रतिमान' तसेच त्यांनी 'वृक्षक्रांती चळवळी'च्या माध्यमातून देशभर हरित क्रांतीला चालना देण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राजस्थानच्या सहकार विभागाचे सचिव डॉ. समित शर्मा, माजी केंद्रीय मंत्री आणि राजस्थान विधानसभेचे माजी अध्यक्ष डॉ. सी. पी. जोशी, पद्मश्री पर्यावरणप्रेमी लक्ष्मणसिंह लापोडिया, दामोदर शर्मा, केरळचे माजी पर्यावरण संचालक श्रीकांतन नायर, श्री राजनेश जैन तसेच प्रो. एम. के. पंडित यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# संत भास्कर महाराजांची पालखी पंढरीच्या वाटेवर

प्रतिनिधी २३ जून

**अकोट:** अकोली जहागीर येथून श्री संत भास्कर महाराज यांची पालखी पंढरपूरकडे रवाना झाली. गावातून पालखी निघताना हरिनामाचा गजर झाला.

ही पालखी सालाबाद प्रमाणे विठ्ठल मंदिर मधून निघाली. पालखी पंढरपूर कडे रवाना होत असताना भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक गावकरी तसेच वारकरी जमले होते. जय हरी विठ्ठल असा जयघोष करीत पालखी मार्गक्रमण करीत पंढरपूर येथे पोहचेल.



समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

मंगळवार, दि. २३ जून २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


# गादी दुकानाला भीषण आग; पाच लाखांचे नुकसान

प्रतिनिधी २३ जून





**उमरखेड** : शहरातील ढाणकी रोडवरील पोलीस ठाण्यासमोरील एका गादी दुकानाला सोमवारी (दि. २२) सकाळी शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले. या आगीत दुकानातील साहित्य जळून खाक झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ढाणकी रोडवरील अनिल पुरी यांच्या 'गौरी गादी' या दुकानात सकाळी साडेआठच्या सुमारास अचानक शॉर्टसर्किट झाले. त्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. दुकानातून धुराचे लोट व आगीच्या ज्वाला बाहेर येत असल्याचे दिसताच परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत एक आधुनिक शिवणयंत्र, पाच फोमच्या गाद्या, पाच साध्या गाद्या तसेच गादी निर्मितीसाठी लागणारे अन्य साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीचा फटका शेजारील धान्य दुकानालाही बसला; मात्र वेळीच उपाययोजना झाल्याने तेथील नुकसान किरकोळ राहिले आणि मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच उमरखेड नगरपालिकेच्या अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे आग परिसरातील अन्य दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखता आली. या दुर्घटनेत जीवितहानी टळली असली, तरी सर्व साहित्य जळाल्याने व्यावसायिक अनिल पुरी यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आग लागण्याच्या कारणाचा अधिक तपास सुरू आहे.

# निलगायीची शिकार; बंदुकीसह युवक जेरबंद

प्रतिनिधी २३ जून



**यवतमाळ** : महागाव तालुक्यातील काळी (दो) शिवारात काही महिन्यांपूर्वी घडलेल्या निलगाय शिकारीच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत अवैध देशी बनावटीच्या बंदुकीसह एका युवकाला अटक केली. या कारवाईत सुमारे ५० हजार रुपये किमतीची बंदूक जप्त करण्यात आली असून वन्यजीव शिकारीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणारे व गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम सुरू आहे. त्याअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक २२ जून रोजी पुसद उपविभागात गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काळी (दो) परिसरात सापळा रचण्यात आला.

या वेळी पोलिसांनी सय्यद कलीम उर्फ काळ्या सय्यद हाफिज (वय ३२, रा. काळी दो, ता. महागाव) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी बनावटीची अवैध बंदूक जप्त करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने आपल्या एका साथीदारासह मार्च महिन्यात पांढरकवडा-इंजनी शेतशिवारात निलगायची शिकार केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी यापूर्वीच भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. नव्या तपासात आरोपीचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यानुसार कलम ३ व २५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या धडक कारवाईमुळे अवैध शस्त्र बाळगणारे आणि वन्यजीव शिकारी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# बसस्थानकाच्या नव्या आराखड्यात हनुमान मंदिर विसरले?

## पावसाळ्यात पाणी साचण्याचा धोका; मंदिराच्या पुनर्विकासाची मागणी

प्रतिनिधी २३ जून

**पुनीत मजेठीया**

**आर्णी** : शहरातील नव्याने उभारण्यात आलेल्या बसस्थानकाच्या परिसरातील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या हनुमान मंदिराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. बसस्थानकाचे बांधकाम उंचीवर करण्यात आल्याने मंदिराचा भाग तुलनेने खाली राहिला असून आगामी पावसाळ्यात पावसाचे पाणी थेट मंदिर परिसरात साचण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

बसस्थानकाच्या नव्या कामाचा आराखडा तयार करताना मंदिराच्या अस्तित्वाचा आणि भविष्यात उद्भवणाऱ्या अडचणींचा पुरेसा विचार करण्यात आला नाही. परिणामी, आज मंदिर परिसर खालच्या स्तरावर गेला असून पावसाचे पाणी साचल्यास मंदिराचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय मंदिराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असल्याने भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. काही सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या युवकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून हा प्रश्न नगर परिषद प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मात्र ही कारवाई तात्पुरती ठरली असून कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप झालेली नाही. नागरिकांची मागणी आहे की, मंदिराला सुरक्षित व उंच जागेवर स्थलांतरित करण्यात यावे किंवा त्याच ठिकाणी योग्य नियोजन करून मंदिराचा पुनर्विकास करण्यात यावा. तसेच पावसाचे पाणी मंदिर परिसरात जाणार नाही यासाठी नाल्यांची व पाणी निचऱ्याची प्रभावी व्यवस्था करण्यात यावी. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. बसस्थानकाच्या बांधकामाचा आराखडा तयार करणारे अभियंते, काम करणारा ठेकेदार की संबंधित शासकीय यंत्रणा, यापैकी मंदिराच्या दुर्लक्षाबाबत उत्तर कोण देणार, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. आगामी पावसाळ्यापूर्वी प्रशासनाने मंदिर परिसराची पाहणी करून ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा धार्मिक स्थळाच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याची भावना भाविक व नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



"मंदिर परिसरातील घाण आणि पाणी साचण्याच्या समस्येकडे प्रशासन, अभियंते आणि ठेकेदार यांचे दुर्लक्ष का झाले? भाविकांच्या श्रद्धास्थानाचे संरक्षण करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार?"

**सुनील सूर्यवंशी (ठाकूर)**
**हनुमान भक्त आर्णी**





# वेणी धरणात करंटच्या साह्याने मासेमारी

## जलचर संपत्ती धोक्यात

प्रतिनिधी २३ जून



**महागाव** : तालुक्यातील वेणी धरणामध्ये मोठी बॅटरीच्या सहाय्याने विद्युत प्रवाह सोडून मासेमारी केल्याचा गंभीर प्रकार शनिवारी सायंकाळी उघडकीस आला आहे. या घटनेमुळे धरणातील मत्स्यसंपत्ती तसेच पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

शनिवारी सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास काही व्यक्ती बॅटरीच्या साहाय्याने धरणातील पाण्यात विद्युत प्रवाह सोडून मासेमारी करत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. या प्रकारात उत्तर प्रदेशातील दोन व्यक्तींचा सहभाग असल्याची माहिती समोर आली आहे. नागरिकांनी तत्काळ महागाव पोलीस स्टेशन तसेच मत्स्य व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली.विद्युत प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणात मासे मृत्यूमुखी पडले आहे, या घटनेमुळे जलचर संपत्तीला मोठा फटका बसला आहे. पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी या प्रकाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही वेणी धरण परिसरात विषारी औषध टाकून मासेमारी करण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा असून त्यामुळे मत्स्यसंपत्तीच्या सातत्याने होत असलेल्या ऱ्हासाबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. अशा घटनांमुळे शासनाच्या महसुलालाही फटका बसत असून मत्स्य व्यवसायावर अवलंबून असलेल्या मच्छीमारांचे मोठे नुकसान होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच वेणी धरणातील मत्स्यसंपत्तीच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, संबंधित मच्छीमार संस्थेच्या कारभाराबाबतचे प्रकरण जिल्हा निबंधक, यवतमाळ यांच्याकडे दाखल असून त्यावर सुनावणी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा बेकायदेशीर मासेमारीचा प्रकार समोर आल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी या घटनेची माहिती संबंधित विभागांना दिली असली तरी वृत्त लिहिपर्यंत करंट टाकून मासेमारी करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे या प्रकारातील दोषींना अभय कोणाचे, असा सवाल परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे

# सलग तिसऱ्यांदा यश; ॲड. आशीष देशमुख यांचा सत्कार



प्रतिनिधी २३ जून

**पुसद** : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्या निवडणुकीत संपूर्ण मतांचा कोटा पूर्ण करत सलग तिसऱ्यांदा दैदिप्यमान विजय मिळवल्याबद्दल ॲड. आशीष भाऊ देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दि. २२ जून रोजी शेंबाळपिंपरी येथील त्यांच्या निवासस्थानी मान्यवरांनी भेट देत त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यावेळी शेंबाळपिंपरीचे राजे दिलीपराव देशमुख, यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सभापती राम देवसरकर, सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल निक्कम, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुलभाई सिद्दीकी तसेच राजे शिवराज देशमुख उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. आशीष देशमुख यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सलग तिसऱ्यांदा मिळालेल्या या यशामुळे परिसरात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनी गुणवंतांचा सत्कार

प्रतिनिधी २३ जून

**पुसद**: आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र योग शिक्षक संघ व भारतीय जनता पार्टी, पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन विरंगुळा योग केंद्र येथे उत्साहात साजरा करण्यात आला. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास योगसाधक, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपच्या जिल्हाध्यक्षा डॉ. आरती फुफाटे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज नीलपवार उपस्थित होते. यावेळी प्रा. गोविंद फुके, डॉ. रूपाली जयस्वाल, दीपक काळे, निलेश पेंशनवार, कैलास गावनर, विलास पलीकोंडावार, मनोज नाईक, प्रवीण मस्के, शैलेजा मडके, कल्पना मस्के, ॲड. बाबूराव मस्के, राजू सोनुने आदी मान्यवर उपस्थित होते. योगामुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक लाभ मिळतात. योग ही प्रभावी उपचार पद्धती असून जगभरात त्याचे महत्त्व वाढत असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले. पुसद शहराने योग चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचाही उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमात समाजसेवा क्षेत्रात रक्तदानाद्वारे उल्लेखनीय कार्य करणारे गिरीश अनंतवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच शंखनाद तन्मय मडके यांचे कौतुक करण्यात आले. नीट परीक्षेत ९९.९४ पर्सेंटाइल मिळविल्याबद्दल कु. सिद्धी शैलेश चिद्दरवार हिचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सामूहिक योगासने, प्राणायाम व ध्यानसाधनेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्रत्येक नागरिकाने नियमित योगाभ्यास करून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन जिल्हाध्यक्ष मनोज नाईक यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रवीण मस्के यांनी केले. महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे पदाधिकारी, सदस्य, योगशिक्षक, योगसाधक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



# यवतमाळात अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात मोर्चा

प्रतिनिधी २३ जून

**यवतमाळ** : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नेताजी मार्केट परिसरातील फुटपाथ दुकानदारांवर सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात आज यवतमाळात मोठा जनआंदोलनाचा सूर उमटला. विदर्भ वीर कन्या सौ. क्रांती सागर राऊत (धोटे) यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमणधारक व्यापारी व लघु व्यावसायिकांचा विराट मोर्चा काढण्यात आला.

हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत शासनाला निवेदन सादर करून संपन्न झाला. "आधी पुनर्वसन, मगच कारवाई" अशी ठाम भूमिका मोर्चेकऱ्यांनी घेत प्रशासनाच्या कारवाईविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. दुपारच्या रखरखत्या उन्हात निघालेल्या या मोर्चात शेकडो व्यापारी, लघु दुकानदार व त्यांच्या कुटुंबीयांनी सहभाग घेत जोरदार घोषणाबाजी केली. नेताजी मार्केट परिसरातील अनेक वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या लघु व्यावसायिकांवर कारवाई केल्याने उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व विदर्भ अन्याय निवारण समितीच्या अध्यक्ष सौ. क्रांती धोटे यांनी केले. यावेळी विजयाताई धोटे, युवा नेते लालजी राऊत, नगरसेवक संतोष बोरले, डॉ. प्रदीप राऊत, श्रीराम भाऊ खिरेकर, गणेश कोसरकर, तेजस चव्हाण, संजय लोंढे, प्रकाश बत्रा, गणेश बत्रा, भागचंद कुकरेजा, निलेश पाचकवडे, वाहिद अकबानी, राहुल अग्रवाल, शंकर मोकळकर यांच्यासह अनेक व्यापारी उपस्थित होते. मोर्चादरम्यान नगर परिषद प्रशासनावर गंभीर आरोप करत शासकीय भूखंडांचा वापर व नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. काही भूखंड बिल्डर लॉबीच्या फायद्यासाठी वापरले जात असल्याचा आरोपही करण्यात आला.




# न्याय मागण्यांसाठी एसटी कर्मचा-यांचा एल्गार

प्रतिनिधी २३ जून



**उमरखेड आगार प्रवेशद्वारावर आंदोलन**

**उमरखेड** : महाराष्ट्र राज्य एसटी कामगार कृती समितीच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी (दि. २२) उमरखेड आगाराच्या प्रवेशद्वारावर दुसऱ्या टप्प्यातील द्वारसभा आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी शासन व महामंडळ प्रशासनाचे लक्ष वेधत आपल्या न्याय्य मागण्या तातडीने मंजूर करण्याची मागणी केली. कर्मचाऱ्यांनी सन २०१६ पासूनची तीन टक्के वार्षिक वेतनवाढ लागू करावी, घरभाडे भत्ता १०, २० व ३० टक्के दराने द्यावा, महागाई भत्त्याची संपूर्ण थकबाकी अदा करावी तसेच एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी मांडल्या.

या आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. मागण्यांची पूर्तता न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनात एसटी कामगार संघटनेचे आगार अध्यक्ष विकास सूर्यवंशी, सचिव सुरेश मोरे, कृषी अध्यक्ष संजय कदम, कार्याध्यक्ष गजानन नंदनवार, वरिष्ठ लिपिक कांगणे, नावेद, महिला प्रतिनिधी मीरा आगरमोरे, श्रीमती लाव्हरे यांच्यासह आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी २३ जून

**दिग्रस** : नापिकी आणि कर्जबाजारीपणाच्या वाढत्या ओझ्याला कंटाळून दिग्रस येथील २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी रात्री उघडकीस आली.

सुदर्शन संजय गायकवाड (वय २३, रा. गुरुदेवनगर, दिग्रस) असे मृत युवकाचे नाव आहे. माहितीनुसार, सुदर्शन गायकवाड हा वडिलांच्या नावावरील शेतीची जबाबदारी सांभाळत होता. शेतीच्या उत्पन्नावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. मात्र गेल्या काही काळापासून नापिकी, आर्थिक अडचणी आणि कर्जाच्या वाढत्या ताणामुळे तो मानसिक तणावाखाली होता. या नैराश्यातून त्याने राहत्या घरी लोखंडी अँगलला साडी बांधून गळफास घेत आत्महत्या केली. सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. सुदर्शनची आई त्याला जेवणासाठी बोलाविण्यास गेली असता तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. कुटुंबीयांनी तत्काळ त्याला दिग्रस ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. सुदर्शनचा विवाह अवघ्या वर्षभरापूर्वी झाला होता. घटनेच्या दिवशी त्याची पत्नी माहेरी गेली होती. त्याच्या पश्चात आई, वडील आणि पत्नी असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.


**महाराष्ट्र शासन तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**झरीजामणी यांचे कार्यालय, ता. झरीजामणी**

क्रमांक/अका/प्रस्तु 2/कावी/ 106/2026

दिनांक 17/06/2026

## जाहीर प्रगटन

प्रस्तुत प्रकरणात आवेदक रघुनाथ गोविंदा रोंगे रा भेंडाळा यांनी त्यांचे नातु हिमांशु संजय लोडे यांची जन्म दि 05/10/2007 रोजी मौजा भेंडाळा येथे झाला असून त्यांची जन्माची नोंद त्यावेळी ग्रामपंचायतला माहिती अभावी केली नसल्याने जन्म/मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये नोंद उपलब्ध नाही. सबब सदर तारखेची जन्माची नोंद ग्राम पंचायत भेंडाळा येथील जन्म मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करावा. याबाबतचा अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत भेंडाळा येथील जन्म नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काठीठी सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा./- (अक्षय रासने)**
**तहसिलदार, झरी जामणी**

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. २३ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ग्रामीण भागात कलम ३७(१) व(३) लागू

**अमरावती:** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)व(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. २७ जून २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

# श्री क्षेत्र कौंडण्यपूर माता रुक्मिणी पालखी यात्रेचे तपोवन गेट-विद्यापीठ चौकात शोध प्रतिष्ठानच्या वतीने भव्य स्वागत

## रुख्मिणी माता पालखी यात्रा विदर्भाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसाचे प्रतीक - यश खोडके

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती:** विदर्भाची कुलस्वामिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री. क्षेत्र कौंडण्यपूर येथील माता रुक्मिणीच्या पालखी सोहळ्याला ऐतिहासिक. अलौकिक व गौरवशाली अशी धार्मिक व अध्यात्मिक परंपरा लाभली आहे. आषाढी एकादशीला श्री. क्षेत्र पंढरपूर मध्ये दाखल होणारी विदर्भातील ही एकमेव मानाची पालखी असून, ही परंपरा चार शतकांहून अधिक काळापासून अखंडपणे सुरू आहे. कौंडण्यपूर ते पंढरपूर हा पालखी सोहळा केवळ धार्मिक परंपरा नसून विदर्भाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसाचे प्रतीक आहे. ही परंपरा आजही समस्त वारकऱ्यांना भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांची प्रेरणा देत आहे. असे प्रतिपादन शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी केले.

श्री. क्षेत्र कौंडण्यपूर या माता रुक्मिणी मातेचे माहेरातून लेकीला सासरी पंढरपूर पाठविण्याच्या परंपरेनुसार श्री. क्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ झालेली श्री. रुक्मिणी मातेची ४३२ वी पालखी यात्रा आज दिनांक २२ जुन रोजी



अमरावती शहरात दाखल झाली. टाळ, मृदंग, वीणेचा नाद आणि रुक्मिणीमातेचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात या पालखी सोहळ्याचे तपोवन गेट - विद्यापीठ चौक येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी पालखीचे स्वागत, पुजन व दर्शन घेऊन श्रींचे कृपाशिर्वाद घेतले. तसेच विश्व कल्याणाची मनोकामना करीत बळीराजा सुखावण्यासाठी धो-धो पाऊस पडू दे, अशी श्रींच्या चरणी प्रार्थना केली.

दरम्यान रांगोळ्या, फुलांची उधळण, आतिषबाजी करून समस्त वारीचे स्वागत करीत पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी यश खोडके यांनी पालखीला आपल्या खांद्यावर घेऊन पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ केले. यावेळी टाळ, मृदंग, वीणेचा नाद आणि रुक्मिणीमातेचा जयघोष यामुळे अमरावतीनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असल्याचे चित्र दिसून आले. या पालखी सोहळ्याला शोध प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सहकारी तसेच पंचक्रोशीतील वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार प्रवीण पोटे यांचा गौरव



प्रतिनिधी २३ जून

**अमरावती :** विधान परीषदेचे महायुतीचे उमेदवार असलेले प्रविण पोटे पाटील यांचा प्रचंड बहुमताने विजय झाल्याबद्दल आ.रवि राणा यांच्यावतीने युवा स्वाभिमान पार्टीचे उपमहापौर सचिन भेंडे व गटनेते नाना आमले यांनी त्यांच्या कार्यालयात जाऊन पुष्पगुच्छ देऊन केले अभिनंदन महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे-पाटील यांनी प्रचंड बहुमताने विजय संपादन केल्याबद्दल आ.रवि राणा यांच्यावतीने युवा स्वाभिमान पार्टीचे उपमहापौर सचिन भेंडे तसेच गटनेते नाना आमले यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उपमहापौर सचिन भेंडे यांनी सांगीतले की, प्रवीण पोटे-पाटील यांचे अभिनंदन करताना हा विजय कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचा आणि महायुतीच्या एकजुटीचा परिणाम असल्याचे म्हटले. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तसेच अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कार्य होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## मसानगंज व तपोवन परिसरात प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणी मोहीम; १४,५०० दंड वसूल

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले झोन क्र.१ यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (२२ जून) मसानगंज, तपोवन परिसर आणि लगतच्या व्यापारी भागात प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २३ आस्थापनांची तपासणी करण्यात





आली. तपासणीदरम्यान काही ठिकाणी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर तसेच डस्टबिन नियमांचे उल्लंघन आढळून आल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करताना आढळून आलेल्या संतराम साहू यांना ५,००० व राजेश पंचमलाल साहू यांना ५,००० असा दंड आकारण्यात आला. तसेच डस्टबिन नसल्याबाबत अंजली किराणा यांना १,०००, जय गजानन धान्य भंडार यांना १,०००, सारिका उज्जैनकर यांना ५००, गणराज पान सेंटर यांना ५००, संजीवनी गावंडे यांना ५०० आणि जितेंद्र पाटील यांना १,००० दंड आकारण्यात आला.

या कारवाईत एकूण १४,५०० इतका दंड वसूल करण्यात आला. महानगरपालिकेने नागरिक व व्यावसायिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन केले आहे.

सदर मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डीक्याव, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, मेघराज ढेनवाल, इमरान खान, रोहित हडाले, परिक्षीत गोरले, आशिष सहारे आणि एम. सैय्यद यांनी सहभाग घेतला.

## विदेशी दारूचा साठा असलेल्या ठिकाणावर पोलिसांची धाड

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी अवैध्यरित्या देशी/विदेशी दारू विक्री तसेच साठवनुक करूण ठेवणा-या इसमावर धाडी टाकुण योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

२२/०६/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्ये पथक पेट्रोलीग करीत असताना गूप्त बातमी दाराकडून माहीती मिळाली कि, मोहन नगर येथील इसम नामे विपीन बुंदेले हा त्याचे घराच्या मध्ये विदेशी दारूची मोठ्या प्रमाणेत साठवनुक करूण





ठेवली आहे अशा मिळालेल्या माहीती वरूण गुन्हे शाखेचे पथक हे मोहन नगर नवसारी येथे विपीन बुंदेले यांचे राहते घरी गेलो नमुद इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विपीन रमेश बुंदेले वय ३८ वर्ष रा. मोहन नगर नवसारी अमरावती त्याचे घराची झडती घेतली असता त्याचे घरा मध्ये २४ कॅरेट तेलाच्या ५ पृष्टाच्या डब्यांमध्ये ध्र्ंथ् एऊँड कंपनीच्या १८० एम.एल. च्या १५० नग असा एकुण कि.अ. ३७,५००/-रू. वा मुददेमाल जप्त करून ताब्यात घेतला. वरून नमुद इसमा विरूध्द पोरटे गाडगे नगर येथे कलम ६५ (ई) महा. दारू बंदी कायदया अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ताब्यात घेण्यात आलेला इमाचे नाव विपीन रमेश बुंदेले वय ३८ वर्ष रा. मोहन नगर नवसारी अमरावती ताब्यात घेण्यात आलेला मुददेमाल ध्र्ंथ् एऊँड कंपनीच्या १८० एम.एल. च्या १५० नग असा एकुण कि.अ. ३७,५००/- रू. चा मुददेमाल आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ ०१), पोलीस उपायुक्त श्याम घुगे (परिमंडळ ०२), पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ मुख्यालय (गुन्हे), सपोआ शिवाजी बचाटे (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

## आमला येथे गावठी हातभट्टीवर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती :** अवैध दारू विक्री तसेच गावठी दारू काढणारे व विक्री करणारे याचेवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण यांनी आदेश निर्गमीत केले होते त्या अनुषंगाने आम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी सतिष कुलकर्णी, व आमचे अधिनस्त अधिकारी व पोलीस स्टाफ यांना गोपनीय बातमीदारा कडुन खात्री लायक बातमी मिळाली कि, ग्राम आमला येथील पारधी बेडा येथे अवैध गावठी हात भटटीची दारू काढुण विक्री करीत आहे. अशा माहीती वरून आमचे अधिनस्त अधिकारी व स्टाफ



तसेच पोलीस स्टेशन दर्यापुर येथील स्टाफ असे सदर ठिकाणी गेलो असता ग्राम आमला येथील पारधी बेडा येथे एका घरा समोर एक इसम त्याचे ताब्यातील मोटर सायकल वर बसुन दारू विक्री करीत आहे. त्याचेवर रेड केली असता तो पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेला त्याचे ताब्यातील शाईन कम्पनीची मोसा क्र एमएच २७ ईई ८१२१ व त्यावर २० लिटर पांढ-या रंगाची गावठी हात भटटीची दारू तसेच घराचे अंगणामध्ये इंधणाचे खाली १० नग प्लास्टीक बॉटल ज्यामध्ये २० लिटर गावठी हात भटटीची दारू तसेच घराचे मागील खाली जागेत ५० लिटर मापाचे चार प्लास्टीक ड्रम व १५ लिटर मापाचा एक लोखंडी पिपा ज्यामध्ये गावठी हात भटटीची दारू करीता मोहमाचा सडवा असा एकुण २१५ लिटर मोहमाचा सडवा, ४० लिटर गावठी हात भटटीची दारू व एक मोटर सायकल असा एकुण १,१५,५०० रू चा माल मिळुन आल्याने आरोपी उमेश चव्हाण रा आमला याचे विरूध्द विविध कलमान्वये कार्यवाही करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांचे आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी सतिष कुलकर्णी साहेब, यांचे मार्गदर्शनात पोउपनी राजु चौधरी, पोहेकॉ महेंद्र तायडे, पोहेकॉ शिवपाल डाबेराव, मपोहेकॉ सुचिता किरसान, पोहेकों अमित वानखडे, पोकों पवन पवार यांनी केली आहे.

## देशी कट्टा, ६ जिवंत काडतूसासह आरोपीस अटक

### बुलडाणा जिल्ह्यातून शस्त्र घेतल्याची आरोपीची कबुली

**अमरावती :** शहरात सोमवारी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवून एका आरोपीला एक देशी कट्टा व सहा जिवंत काडतुसासह ताब्यात घेतले. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशावरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ही कारवाई केली. गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहीती मिळाली की, फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन हद्दीत पवन उर्फ क्षितीज सुनिल लोणारे (२१) रा. रद्दीपुरा, चपराशीपुरा, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती हा इसम स्वत: जवळ देशी बनावटी कट्टा (पिस्टल) बाळगून डेन्टल कॉलेजकडून वडाळी पुलाकडे येणाऱ्या डांबरी रोडवर पांढऱ्या रंगाच्या मोपेड गाडी वर उभा आहे. यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने सदर इसमास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता व त्याचे ताब्यातील मोपेड गाडीच्या डिक्कीची पाहणी केली असता





त्यामध्ये एक देशी कट्टा व ६ जिवंत काडतूस मिळून आले. आरोपीस सदर देशी कट्टा व जिवंत काडतुस याबाबत विचारणा केली असता सांगितले की ढग्या चव्हाण रा. निमखेडी ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा यांचेकडून घेतले असल्याचे सांगितले. यावेळी आरोपीच्या ताब्यातून देशी कट्टा, ६ जिवंत काडतुसे, एक मोबाइल फोन आणि मोपेड गाडी असा १ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद आरोपी हा अग्णीशस्त्र स्वत: जवळ बाळगूण मिळुण आल्याने नमूद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे कलम ३/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ मुख्यालय, सपोआ शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार-सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आरितक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

## अमरावतीत हेल्मेट सक्ती; जिल्हा ग्रामीण पोलिसांचे आदेश

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती:** ग्रामीण जिल्हयामध्ये सन २०२५ हया वर्षामध्ये एकूण ५१९ अपघात झाले होते. त्यापैकी २९० प्राणांतिक अपघातामध्ये ३१२ नागरिकांचा मृत्यू झाला होता.

तसेच प्राणांतिक अपघातापैकी ७० टक्केचे आसपास अपघात हे मोटर सायकल चालकांचे होते. तसेच मोटर सायकल अपघातामध्ये मृत्युमुखी पडणारे वाहनचालकांचा मृत्यू हा डोक्यात हेल्मेट न घातल्याने डोक्यास गंभीर दुखापत झाल्यामुळे झाले आहेत.

दुचाकी वाहनांचे अपघातात मृत्युमुखी पडणारे वाहनचालकांची संख्या कमी करण्याचे उद्देशाने पोलीस अधीक्षक कार्यालयात अमरावती ग्रामीण तर्फे अमरावती ग्रामीण जिल्हयात हेल्मेट सक्तीबाबत ९/०६/२०२६ रोजी जाहिरनामा काढून तो वर्तमानपत्रे व सोशल मिडियात प्रसारीत करण्यात आला होता. तसेच निकेतन कदम, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण हयांनी हेल्मेट सक्ती अनुषंगाने हेल्मेट वापर करणे बाबतचा व्हिडिओ प्रसारीत करून नागरीकांना दुचाकी चालवितांना व दुचाकीवर प्रवास करतांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले होते. तसेच दिनांक २२/०६/२०२६ रोजी अमरावती ग्रामीण जिल्हयातील ३१ पोलीस स्टेशनमधील ठाणेदार व पोलीस अंमलदार हयांनी हेल्मेट न वापरणारे जवळपास ५,००० चे आसपास दुचाकी स्वार हयांचे पुष्पमाला घालून प्रतिकात्मक स्वागत केले होते. तसेच नागरीकांना दुचाकी चालवितांना हेल्मेट वापरणेबाबत समज देण्यात आली होती.

दिनांक २३/०६/२०२६ पासून जे दुचाकीस्वार व त्यांचे पाठीमागे बसणारे व्यक्ती हेल्मेटचा वापर करणार नाहीत त्यांचेवर मोटर वाहन कायदा अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश निकेतन कदम, पोलीस अधीक्षक यांनी अमरावती ग्रामीण हद्दीतील सर्व ठाणेदार, पोलीस अधिकारी व अंमलदार हयांना दिले आहेत.

तसेच निकेतन कदम पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण हयांनी नागरीकांना दुचाकी वाहन चालवितांना व दुचाकी वाहनावर प्रवास करतांना हेल्मेटचा वापर करण्याचे तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्याचे नागरीकांना आवाहन केले आहे.

## आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त अमरावतीत सामूहिक योगाभ्यास; विविध संस्थांच्या सहभागातून कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी २३ जून

**अमरावती:** आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त अमरावती महानगरपालिका आणि श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस इनडोअर स्टेडियम येथे भव्य सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे आणि नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाला विधी समिती उपसभापती डॉ. मधुरा मिलिंद काहाळे, अमरावती महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्र. ३, दस्तुर नगर कार्यालयाचे सहायक आयुक्त नितीन बोबडे, सहायक क्षेत्रीय अधिकारी शेखर सोनकांबळे, अभियंता मिलिंद काहाळे तसेच सुधीर रोहनकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांना नियमित



योगाभ्यास करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, पतंजली योग समिती, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तसेच महाबँक ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्था यांचा सक्रिय सहभाग लाभला. विविध संस्थांमधील प्रशिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि योगसाधकांनी सामूहिकरीत्या योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा आणि सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी योगदिनाचे महत्त्व विषद करण्यात आले. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत असलेले ताणतणाव, मानसिक अस्वस्थता आणि विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी योग अत्यंत प्रभावी माध्यम असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्थैर्य, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होते, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नेताजी सुभाषचंद्र बोस इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित या कार्यक्रमात विविध शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, योगप्रेमी नागरिक, विद्यार्थी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सर्व सहभागींच्या एकत्रित योगाभ्यासामुळे संपूर्ण परिसरात आरोग्य, शिस्त आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी योगाच्या विविध क्रियांचा अनुभव घेत निरोगी जीवनाचा संकल्प केला.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून त्याचा प्रसार जागतिक स्तरावर होत असल्याबद्दल अभिमान व्यक्त केला. आज जगभरातील कोट्यवधी लोक योगाचा स्वीकार करत असून भारताने जगाला दिलेली ही अनमोल देणगी असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी आणि आनंदी जीवन जगावे, असे आवाहनही करण्यात आले.

अमरावती महानगरपालिका आणि श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे आंतरराष्ट्रीय योगदिनाचा हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व सहभागी संस्था, प्रशिक्षक, स्वयंसेवक आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले.

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त आयोजित या सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाने 'योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करत आरोग्यदायी आणि सकारात्मक जीवनशैलीचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविला

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. २३ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अनुदान रखडल्याने निराधारांची कोंडी!

**खामगाव :** राज्य व केंद्र शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि निराधार लाभार्थ्यांना दिले जाणारे मासिक अनुदान मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. त्यामुळे या योजनांवर अवलंबून असलेल्या हजारो लाभार्थ्यांची आर्थिक कोंडी झाली असून, दैनंदिन खर्च भागवणेही कठीण झाले आहे. निराधार महिला, वृद्ध, दिव्यांग तसेच अन्य गरजू नागरिकांसाठी ही अनुदानाची रक्कमच उपजीविकेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, अनुदान वेळेवर जमा होत नसल्याने औषधोपचार, अन्नधान्य खरेदी आणि इतर आवश्यक खर्च भागवताना त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनुदान खात्यात जमा झाले की नाही, याची माहिती घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या तहसील कार्यालयात वारंवार चकरा सुरू आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करा!

**♦ माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी ♦ उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन कर्जमाफीच्या निकषांमध्ये बदल करण्यासंदर्भात दिले निवेदन**

प्रतिनिधी २३ जून

**खामगांव :** कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ, उत्पादन खर्चात वाढ आणि शेतीमालाला हमीभाव नसल्यामुळे जगाचा पोशिंदा बळीराजा हा संकटात सापडला आहे,असे असतांना राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर करून या योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे परंतु या योजनेतील जाचक अटींमुळे हजारो शेतकरी पुर्ण लाभापासुन वंचित राहण्याची शक्यता आहे.म्हणून राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने या योजनेतील महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेबाबत असलेल्या अटींसह इतर जाचक अटी काढून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी



कर्जमुक्ती योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी मुंबई येथील देवगिरी बंगला येथे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन त्यांना या मागणीसंदर्भात निवेदन सादर केले. सानंदा यांनी दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असला तरी योजनेतील काही अटींमुळे अनेक पात्र शेतकरी पूर्ण लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. योजनेनुसार १ एप्रिल २०१९ नंतर कर्ज घेतलेल्या आणि ३० जून २०२५ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत लाभ मिळणार आहे. मात्र महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचीच मदत मिळणार असून उर्वरित रक्कम स्वतः भरावी लागणार आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांनी यापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेला असल्याने सध्याच्या निकषांमुळे त्यांना केवळ ५० हजार रुपयांचा लाभ मिळेल. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा अपेक्षित फायदा होणार नाही. परिणामी शासनाने मंजूर केलेल्या ३६ हजार कोटी रुपयांच्या निधीपैकी फक्त १५ हजार कोटी निधी खर्च होऊन मोठा निधी खर्च न होता शिल्लक राहणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करण्यासाठी राज्यभरात अनेक ठिकाणी शेतकरी आंदोलन करत असून बुलढाणा जिल्ह्यात शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आणि अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी निकषांमध्ये तातडीने बदल करावेत, अशी मागणी सानंदा यांनी केली.यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी शेतकरी बांधवांच्या हिताचा विचार करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील निकषांमध्ये बदल करण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक प्रयत्न केले जातील,अशी ग्वाही दिली.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे उपस्थित होते.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्याबद्दल माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे शेतकरी बांधवांतर्फे आभार देखील मानले आहेत.

## आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात मोर्चा

### कृती समितीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २३ जून

**खामगाव:** अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शवत अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने २२ जून रोजी खामगाव येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढून निवेदन सादर केले.

निवेदनानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाने अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत अभ्यास करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन केली होती. या समितीने १ एप्रिल २०२६ रोजी शासनाला अहवाल सादर केला; मात्र, हा अहवाल अद्याप जनतेसमोर जाहीर करण्यात आलेला नाही. अहवाल सार्वजनिक न करता हरकती व सूचना मागविण्यात येतअसल्याने प्रक्रियेबाबत शंका निर्माण होत असल्याचे समितीने नमूद केले आहे. समितीने अहवाल सर्वसामान्यांसाठी खुला करावा, पुरेसा कालावधी देऊन त्यानंतरच हरकती मागवाव्यात, अशी मागणी केली आहे. तसेच उपवर्गीकरणाचा निर्णय घेण्यापूर्वी अनुसूचित जातींतील विविध घटकांची अद्ययावत लोकसंख्या निश्चित करण्यासाठी नव्याने सर्वेक्षण किंवा जनगणना करण्यात यावी, अशी भूमिका मांडली आहे. उपवर्गीकरण आवश्यक असल्यास ते केवळ शिक्षण व नोकरीपुरते मर्यादित न ठेवता सर्व क्षेत्रांत समान निकषांवर विचारात घ्यावे, अशी मागणीही निवेदनातून केली. यावेळी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसह समाजबांधव उपस्थित होते.

**मंत्र्यांना पाठविल्या निवेदनाच्या प्रती**

उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

## पहूरजिरा येथे मारहाणीची घटना; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २३ जून

**खामगांव:** जलंब पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पहुरजिरा येथे झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचाबत सोमेश्वर विश्वनाथ वडोदे (३३) रा. निमगाव, ता. नांदुरा, जि. बुलडाणा यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून परशुराम नरहरी झाडोकार (वय ३५ वर्षे), प्रज्यत्त प्रभाकर झाडोकार (३२) आणि शिवाजी नारायण झाडोकार (३०) सर्व रा. पहूरजिरा, ता. शेगाव यांच्याविरुद्ध जलंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोमेश्वर विश्वनाथ बडोदे यांचा आरोप आहे की, आरोपी परशुराम नरहरी झाडोकार हा हातात फायटर घेऊन आला व त्याने फायटरने फिर्यादीच्या डोक्यावर वार करून त्यांना जखमी केले. त्यावेळी आरोपी प्रज्वल प्रभाकर झाडोकार व शिवाजी नारायण झाड़ोकार हे देखील घटनास्थळी आले आणि त्यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, दरम्यान, भांडणाचा आवाज ऐकून वाद सोडविण्यासाठी फिर्यादीचा चुलत मावसभाऊ सुहास महादेव चतारे घटनास्थळी आला असता आरोपी प्रज्वल प्रभाकर झाडोकार याने काठीने त्याच्या डोक्यावर व पाठीवर मारहाण केली. या मारहाणीत सुहास महादेव चतारे जखमी झाले असून त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव झाला. तसेच तिन्ही आरोपींनी फिर्यादी व सुहास महादेव चतारे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीच्या तक्रारी, तोंडी अहवाल व वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे जलंब पोलीस ठाण्यात अप. क्र. १९७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(१), ११५, ३५१(२), ३५२ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेश हीवाळे, पोलीस स्टेशन जलंब हे करीत आहेत.

## विवाहितेची आत्महत्या, दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

**♦ उसनवारीच्या पैशांवरून छळ केल्याचा आरोप**

प्रतिनिधी २३ जून

**शेगाव:** माहेरहून आणलेल्या उसनवारीच्या पैशांवरून होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून एका विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना २१ जून रोजी शहरातील विश्वनाथनगर-२ परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी मृत विवाहितेच्या भावाच्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिसांनी एका दाम्पत्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत विवाहिता आणि आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. मृतक महिलेच्या आई-वडिलांनी आरोपी भास्कर मानसिंग राठोड व जया ऊर्फ गोकर्णा भास्कर राठोड यांना मुलीच्या संसारात आर्थिक अडचण येऊ नये, म्हणून तीन लाख रुपये उसनवारीने दिले होते. त्यापैकी काही रक्कम परत करण्यात आली होती; मात्र उर्वरित रकमेची मागणी विवाहिता वारंवार करीत होती. २१ जून रोजी दुपारी ३ वाजता विवाहिता पैसे मागण्यासाठी आरोपींच्या घरी गेली असता, त्यांनी रक्कम देण्यास नकार देत टाळाटाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे मानसिक त्रास वाढल्याने विवाहितेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर मृतक महिलेच्या भावाने शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी भास्कर मानसिंग राठोड व जया ऊर्फ गोकर्णा भास्कर राठोड या दाम्पत्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०८ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## कार-दुचाकीची समोरासमोर धडक; एक ठार

प्रतिनिधी २३ जून

**शेगाव :** खामगाव-शेगाव मार्गावरील माउली वॉटर पार्कसमोर कार आणि दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २२ जून रोजी दुपारी घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खामगावकडून शेगावच्या दिशेने जाणारी एम. एच. २३ एएस ००९० क्रमांकाची कार आणि शेगावकडून खामगावच्या दिशेने येणारी एम. एच. ३० एन ९७३० क्रमांकाची दुचाकी यांच्यात समोरासमोर धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार शिवशंकर तुळशीराम झाडे (५३, रा. नवीन अंदुरा, ता. बाळापूर, जि. अकोला) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर कार चालक घटनास्थळावरुन पसार झाल्याची माहिती आहे. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी



कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१) सहकलम १३४, ३(१) मोटारवाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही वाहने ताब्यात घेतली असून, पुढील तपास शेगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत.

## उमाळी गावात अंगणात झोपलेल्या १९ वर्षीय युवतीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी २३ जून

**मलकापुर:** तालुक्यातील उमाळी गावामध्ये एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. आपल्या घराच्या पटांगणात कुटुंबासह झोपलेल्या एका १९ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात ६५ वर्षीय वृध्दा विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर तालुक्यातील उमाळी येथील रहिवासी असलेली १९ वर्षीय पीडित तरुणी ही २२ जून २६ रोजी रात्री १२;३० ते १ वाजेच्या दरम्यान आपल्या कुटुंबासह घराच्या समोरील पटांगणात (अंगणात) झोपलेली होती. याच वेळी गावातीलच रहिवासी गजानन सहादू रोठे (वय ६५ वर्ष) रा.उमाळी ता.मलकापूर हा त्या ठिकाणी आला. सर्वजण गाढ झोपेत असल्याचा फायदा उठवत आरोपीने गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला. आरोपी पीडित तरुणी झोपली होती त्या खाटेजवळ गेला. पीडितेचे तोंड दाबून तिची छेडछाड करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या स्पर्शामुळे आणि तोंड दाबल्यामुळे पीडित तरुणीला तात्काळ जाग आली. तिने स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असता, नराधम आरोपीने विनयभंग केला आणि तिथून पळ काढला.

या अनपेक्षित आणि धक्कादायक प्रकारामुळे पीडित तरुणी अत्यंत भयभीत झाली होती. तिने घडलेला सर्व प्रकार आपल्या कुटुंबीयांना सांगितला. कुटुंबीयांनी तिला धीर देत तात्काळ पोलीस स्टेशन गाठले. पीडित तरुणीने मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून उपरोक्त आरोपीविरुध्द अप.नं. अप नं- १२८/२६, कलम ७४ बीएनएसएस अन्वये विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाळू टाकरखेडे करीत आहेत.

## दोन अपघातांत दोघांचा मृत्यू, महिला गंभीर जखमी

**♦ मलकापूर व शेगाव परिसरातील घटना**

प्रतिनिधी २३ जून

**मलकापूर/ शेगाव:** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव व मलकापूर परिसरात घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू झाला, तर एक महिला गंभीररित्या जखमी झाली. शेगावजवळ कार व दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. तर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर हरताळा शिवारात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने मलकापूर येथील युवकाचा मृत्यू झाला आणि त्याची पत्नी गंभीररित्या जखमी झाली. या दोन्ही घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संबंधित पोलिस ठाण्यांत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मलकापूर येथील वृंदावन नगरातील रहिवासी दीपक वासुदेव डाबेराव (वय २९) हे पत्नी आशना डाबेराव (वय २६) यांच्यासह जळगाव येथे साहित्य खरेदी करून दुचाकीने मलकापूरकडे परत येत होते. दरम्यान, हरताळा शिवारातील बिस्मिल्ला हॉटेलजवळ भरधाव आलेल्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दीपक डाबेराव यांच्या मानेवरून ट्रकचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मागील सीटवर बसलेल्या आशना डाबेराव या बाजूला फेकल्या गेल्याने त्यांचा जीव वाचला. मात्र त्यांना गंभीर दुखापत झाली असून, त्या बेशुद्ध अवस्थेत होत्या. घटनेची माहिती मिळताच मुक्ताईनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह ताब्यात घेतला. जखमी आशना डाबेराव यांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले.

## मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमास प्रारंभ

प्रतिनिधी २३ जून

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यात २०२६ सालच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (Specialed Intensive Revision SIR) कार्यक्रमास २० जूनपासून प्रारंभ झाला. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यावर भर दिला जाणार आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती भारतीय नागरिक असणे व १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (ँध्) ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती संकलित करणार आहेत. प्रत्येक मतदाराला गणना पत्राच्या दोन प्रती देण्यात येतील. त्यामधील माहितीची पडताळणी करून आवश्यक तपशील भरून स्वाक्षरीसह संबंधित बीएलओकडे जमा करावयाच्या आहेत. जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघांमध्ये एकूण २८८८ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून ते मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करतील. या प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचे (BLA) सहकार्यही महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे मतदार यादीतील दुबार नावे व मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नव्या पात्र मतदारांची नोंदणी करणे सुलभ होणार आहे.

**विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे**

अर्हता दिनांकः १ ऑक्टोबर २०२६, प्रशिक्षण व छपाई : २० जून ते २९ जून २०२६, बीएलओमार्फत घरोघरी भेटीः ३० जून ते २९ जुलै २०२६, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरणः २९ जुलैपर्यंत, प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीः ५ ऑगस्ट २०२६, दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधीः ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६, दावे-हरकतींचा निपटारा ५ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२६, अंतिम मतदार यादी प्रसिद्धी १ ऑक्टोबर २०२६. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना या विशेष पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन बीएलओंना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादी अधिक अचूक व विश्वासार्ह बनण्यास मदत होणार आहे.

## मलकापुरात विदर्भस्तरीय वाद-विवाद स्पर्धा संपन्न; डॉ. कमल काबरा आणि निकिता मालू ठरल्या विजेत्या!

प्रतिनिधी २३ जून

**मलकापुर:** येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून २० जून रोजी स्थानिक महेश भवन येथे एका भव्य विदर्भस्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण विदर्भातून आलेल्या स्पर्धकांनी विविध पैलूंवर आपले विचार मांडले.

या स्पर्धेसाठी 'परिवारामध्ये आर्थिक शिस्त आणि बचतीची सवय: आजची गरज की जुनी विचारसरणी?' हा अत्यंत उद्बोधक विषय ठेवण्यात आला होता. या विषयाच्या बाजूने आणि विरोधात स्पर्धकांनी अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण पद्धतीने आपली मते मांडली. दोन्ही गटांतून (बाजूने व विरोधात) प्रत्येकी एका उत्कृष्ट स्पर्धकाची विजेतेपद म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये डॉ. सौ.




कमल काबरा आणि सौ. निकिता मालू यांनी आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वाने यश मिळवत विजयी होण्याचा मान पटकावला.

स्पर्धेचे परीक्षण आणि मुख्य अतिथी म्हणून ॲड. संजयसिंह ठाकूर सर आणि निंबोळे सर यांनी चोख जबाबदारी पार पाडली. त्यांनी स्पर्धेच्या निकालात परीक्षकाची महत्त्वाची भूमिका निभावली. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या शुभहस्ते सर्व विजेत्यांना आणि सहभागी स्पर्धकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला मंडळाच्या सौ. किरण जाजू, सौ. रेखा मंडोरा, सौ. मनीषा टावरी यांच्यासह मंडळाच्या इतर सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. या कौतुकास्पद उपक्रमाचे शहरात आणि समाज बांधवांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्वागत व कौतुक होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २३ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# जिकडे पाहावे तिकडे तू दिससी नयना...

प्रतिनिधी २३ जून

**अकोला :** शेगांवच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे मंगळवारी सकाळी ७ वाजता शहरात आगमन झाल्यावर शहरातील विविध सामाजिक, धार्मिक व सेवाभावी संस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले. डाबकी रेल्वे गेट जवळ अनोखा हनुमान मंदिर नजीक हजारो भाविक श्रींचे दर्शनासाठी जमले होते.

पालखी मार्गावर ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारून जागोजागी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. गण गण गणात बोते हा मंत्र निनादत होता. भाविकांनी माऊलींचे भव्य स्वागत केले. यावेळी भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच महाप्रसादाची व्यवस्था ही करण्यात आली होती. शहरात पालखीच्या आगमनाने संपूर्ण शहर भक्ती, सेवा व समर्पणाच्या रंगात न्हाऊन निघणार आहे. आरोग्य विभागाकडून वारक-यांसाठी विशेष वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली. आषाढी वारीनिमित्त श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या शेकड़ो वारकऱ्यांन करीता आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले आहे. पालखी मार्गावरील आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली असून विविध ठिकाणी वैद्यकीय उपचार केंद्रे, प्रथमोपचार सुविधा तसेच आवश्यक औषधसाठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय पालखीच्या विश्रामस्थळी व मार्गावरील परिसरात मनपा प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने किटकनाशक फवारणी, स्वच्छता मोहीम व साफसफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. भाविकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण उपलब्ध व्हावे यासाठी संपूर्ण पालखी मार्ग स्वच्छ करण्यात येत असून प्रशासनाकडून आवश्यक सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत.

## श्रींच्या पालखीचे राजराजेश्वर नगरीत भव्य स्वागत

### ४० वर्षांपासून वारकऱ्यांसाठी निःशुल्क चप्पल-दुरुस्ती व पॉलिश सेवा

हरिहर पेठ येथील श्री भक्त चूडामण परसिया हे मागील ४० वर्षांपासून आपल्या सहकाऱ्यांसह श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी निःशुल्क चप्पल-जोडे दुरुस्ती व पॉलिश सेवा देत आहेत. पालखीच्या विश्रांती व मुक्कामस्थळी ही सेवा उपलब्ध करून देत ते वारकऱ्यांची मनोभावे सेवा करीत आहेत. यावेळी प्रल्हाद जोडेवार, गणेश शिरसाट व दशरथ परसिया हे त्यांना सहकार्य करीत आहेत. वारकरी सेवेतून समाजापुढे आदर्श निर्माण करणाऱ्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.






(छाया : दीपक शर्मा)






# नगर परिषद, अकोट

स्वच्छ संकल्प, नवीन उपक्रम  चला आनंद वाटूया, आनंदयात्री होऊया !

सिटी न्यूज सुपरफास्ट 14 वर्ष वर्धापन दिन निमित्त हार्दिक शुभेच्छा !

स्वच्छ सर्वेक्षण 2025-26

**सार्वजनिक सूचना**

## घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची अंमलबजावणी बाबत

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक १ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले आहेत. सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमांनुसार व मा. सर्वोच न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४ / २०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे

**नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील-**

- ओला कचरा - अन्न, भाजीपाला अवशेष, स्वयंपाकघरातील कचरा
- सुका कचरा - प्लास्टिक, कागद, धातू, काच इत्यादी
- सॅनिटरी कचरा - डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इत्यादी
- विशेष / घातक कचरा - बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा इत्यादी

### नागरिकांची जबाबदारी :

- घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे/घंटागाडीत सुपूर्द करणे.
- सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा इत्यादी स्वतंत्रपणे देणे.
- ओला व सुका कचरा मिसळून न देणे.
- सॅनिटरी कचरा सुरक्षिततरीत्या गुंडाळून देणे.
- कचरा जाळणे, नाले/ रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळणे.



### लोकप्रतिनिधींची जबाबदारी :

- आपल्या प्रभागात / वॉर्डात जनजागृती करणे.
- नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

**Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी :**
ज्या संस्था/इमारती/संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे

### अशा संस्थांनी :

- ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट / बायोगॅस प्रक्रिया करणे,
- कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे,
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये,
- महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचनांचे पालन करणे,
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.



नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.
तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.




### संकल्पना :
शहरातील प्रतिष्ठित नागरिक, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांनी यांच्या आनंदाचा दिवस नगर परिषदेच्या विद्यार्थ्यांसोबत घालवणे.

### उपक्रमाचे स्वरुप :
या उपक्रमांतर्गत आपण आपल्या व आपल्या प्रियजनांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस व तत्सम आनंदाच्या दिवशी नगरपरिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांसोबत काही क्षण घालवावेत आणि आपल्याला शक्य त्या प्रकारे विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन आपला आनंद व्दिगुणित करावा.

### तुम्ही काय भेट वस्तू देऊ शकता?
प्रस्तुत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त शालेय साहित्य जसे वही, पेन, अवांतर वाचनिय पुस्तके, चित्रकलेचे साहित्य, स्कूल बॅग, पाणी बॉटल, टिफिन, ड्रेस (गणवेश वगळून) इत्यादी. किंवा शाळेसाठी आवश्यक भौतिक सोयीसुविधा जसे वॉटर फिल्टर, डिजिटल बोर्ड इत्यादी वरीलपैकी एक किंवा अधिक देता येईल.

### अटी व शर्ती :
१) दात्यांनी नियोजित दिवसाच्या किमान तीन दिवस अगोदर आपण कोणत्या शाळेत किंवा काय भेट वस्तू देणार हे शिक्षण विभाग नगर परिषद अकोट यांना कळविणे आवश्यक आहे.
२) भेट द्यावयाचे साहित्या संबधित शाळेचे मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांनी निश्चित करून दिलेल्या वेळेमध्ये देता येईल.
३) शालोपयोगी साहित्य वाटप करताना शाळेतील सर्व मुलांना वाटप करणे शक्य नसल्यास कमीतकमी कोणत्याही एका वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वाटप होणे आवश्यक आहे.
४) सदर उपक्रमांतर्गत भेट देणाऱ्या व्यक्तींना आनंदयात्री संबोधण्यात येईल व त्यांचा शाळेच्या वतिने यथोचित सन्मान केला जाईल.
५) आनंदयात्रींची नोंदवही नगरपरिषदेच्या शिक्षण विभागात ठेवली जाईल.
६) नगरपरिषदेचे प्रशासन अधिकारी हे ह्या उपक्रमाचे नोडल अधिकारी असतील.

| सौ मायाताई विवेक धुळे | प्रथमेश संजय बोरोडे | शशिकांत मारोती बाबर (मशप्रसे) | सलमा बेगम मो. खालीद | मनीष उर्फ अभिजीत रामेश्वर कराळे |
|---|---|---|---|---|
| नगराध्यक्ष नगरपरिषद अकोट | उपनगराध्यक्ष नगर परिषद अकोट | मुख्याधिकारी गट-अ, नगरपरिषद, अकोट. | सभापती शिक्षण समिती नगरपरिषद, अकोट | आरोग्य सभापती नगर परिषद अकोट |


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK